महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २९९ वे दिनांक : २७/१०/२०२६ वार : मंगळवार

## कर्जत प्रकल्पावरून चित्रा वाघ यांचा ठाकरे बंधू आणि रोहित पवारांवर निशाणा



**मुंबई :** कर्जत प्रकल्पावरून आणि वृक्षतोडीवरून सध्या राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. आदित्य ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी यावरून राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. या टीकेला आता भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी प्रत्युत्तर दिले असून, विकासाला आणि रोजगाराला विरोध करणे हीच विरोधी पक्षाची एकमेव नीती बनली आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला आहे. विरोधकांकडून हा प्रकल्प गुजरातचा असल्याचा नॅरेटिव्ह सेट केला जात असल्याचा दावा फेटाळून लावत चित्रा वाघ म्हणाल्या, "हा प्रकल्प गुजरातचा नाही तर पूर्णपणे महाराष्ट्राचा आहे. यातून महाराष्ट्रात ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून हजारो तरुणांना रोजगार मिळणार आहे. तसेच, यातून निर्माण होणारी १२ हजार मेगावॅट वीज फक्त आणि फक्त महाराष्ट्रालाच मिळणार आहे. त्यामुळे तुम्हाला महाराष्ट्राचा विकास नकोय का?" असा सवाल त्यांनी आदित्य ठाकरे, राज ठाकरे आणि रोहित पवार यांना विचारला. हा प्रकल्प प्रदूषणकारी नसल्याचे स्पष्ट करताना वाघ म्हणाल्या, हा कोळशावर चालणारा प्रकल्प नसून पर्यावरणपूरक सौर ऊर्जेवर आधारित आहे. यामुळे वर्षाला तब्बल ४.६ दशलक्ष टन कोळसा जळण्यापासून वाचणार आहे. म्हणजेच ४० लाख वाहनांमधून जेवढे कार्बन उत्सर्जन होते, तेवढे प्रदूषण या एका प्रकल्पामुळे टळणार आहे."भीमाशंकर अभयारण्य धोक्यात असल्याच्या दाव्यावर त्यांनी सविस्तर माहिती दिली. "हा प्रकल्प भीमाशंकर अभयारण्यापासून १६ किलोमीटर आणि ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किलोमीटर लांब आहे. हे सर्व इको-सेन्सेटिव्ह झोनच्या (ESZ) पूर्णपणे बाहेर आहे. सलग १८ महिने वैधानिक प्रक्रिया आणि पर्यावरणीय अभ्यास पूर्ण केल्यानंतरच याला परवानग्या मिळाल्या आहेत," असे त्या म्हणाल्या. वृक्षतोडीच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी सांगितले की, "कंपनीने २३३ हेक्टर जमिनीच्या बदल्यात आधीच २५३ हेक्टर जमीन वनविभागाला सुपूर्द केली आहे. शिवाय त्या ठिकाणी ९० हजार नवी झाडे लावली जाणार आहेत." शेवटी विरोधकांना इशारा देताना चित्रा वाघ म्हणाल्या, "विरोधकांनी महाराष्ट्रातील जनतेची आणि तरुणांची दिशाभूल करणे आता बंद करावे. प्रत्येक चांगल्या प्रकल्पात मिठाचा खडा कालवून महाराष्ट्राचे नुकसान करण्याचे जे गलिच्छ राजकारण सुरू आहे, ते जनता आता खपवून घेणार नाही."

## ५०० कोटींचं प्रकरण संपलं; शिरसाटांचा दावा



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, 500 कोटींची ऑडिओ क्लिप, कर्जतमधील वृक्षतोड आणि राजकीय नेत्यांची विधाने अशा विविध मुद्द्यांवर राज्याचे मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. विशेषतः मराठवाड्यात वाढलेल्या सावकारी आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या मनमानी कारभारावर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, अशा 'गुंड' सावकारांचे परवाने रद्द करण्याची मागणी उद्याच्या कॅबिनेट बैठकीत करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मराठवाड्यात नोंदणीकृत सावकारांची संख्या वाढत असल्याबद्दल आणि त्यांच्या वसुलीच्या पद्धतीवर बोलताना शिरसाट म्हणाले, "ही जुन्या पद्धतीची सावकारी राहिलेली नाही. हे नवीन सावकार म्हणजे टोळ्या बाळगणारे गुंड आहेत. त्यांच्याकडे बाउन्सर आहेत आणि ते कर्जदाराला उचलून नेतात. 20 टक्क्यांपेक्षा जास्त व्याजाने ते वसुली करतात. हा सावकारी व्यवसाय नसून एक प्रकारच्या गुंडगिरीला सरकार लायसन्स देत आहे, असा संभ्रम निर्माण झाला आहे." यासोबतच मायक्रो फायनान्स कंपन्यांवरही कोणतेच निर्बंध नसल्याचे त्यांनी नमूद केले. "कुठूनतरी लायसन्स घेतात, टपरीसारखे ऑफिस टाकतात आणि 5-25 बॉडीगार्ड ठेवून व्याजाचा धंदा सुरू करतात. हे प्रकार तातडीने थांबले पाहिजेत. उद्या कॅबिनेट बैठकीत मी या सर्वांचे लायसन्स रद्द करण्याची मागणी स्वतः करणार आहे," असे शिरसाट यांनी स्पष्ट केले. 500 कोटींच्या ऑडिओ क्लिप प्रकरणावर बोलताना ते म्हणाले, "आमच्या दृष्टिकोनातून हा विषय आता संपला आहे. मुख्यमंत्र्यांनी फॉरेन्सिक चौकशीचे आदेश दिले आहेत. रिपोर्ट आल्यानंतर हे षड्यंत्र कुणी रचले, क्लिप कुणी बनवली आणि यात कोण बोलत आहे, हे समोर येईल. त्यानंतर जे दोषी असतील, त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल." काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वडिलांबद्दल केलेल्या वक्तव्यावर शिरसाट म्हणाले, एखाद्या छोट्या कार्यकर्त्याने असे वक्तव्य केले असते तर आपण समजू शकतो. पण खर्गे यांच्यासारख्या मोठ्या नेत्याने पंतप्रधानांच्या वडिलांपर्यंत जाणे योग्य नाही. ही आपल्या देशाची संस्कृती नाही. खर्गे साहेबांनी याबद्दल माफी मागितली पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली. रायगडमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील वादावर त्यांनी सुनील तटकरे यांना इशारा दिला. "भरत गोगावले आणि शिवसेनेचे इतर नेते महायुतीत मिठाचा खडा पडू नये म्हणून संयमाने घेत आहेत. पण तटकरे साहेबांनीही सामंजस्याची भूमिका घेतली पाहिजे. जर आता हा वाद वाढला, तर तो टोकाचा असेल," असे शिरसाट म्हणाले.

## मनोज जरांगेंचा सरकारला इशारा; म्हणाले, आता सहन होत नाही



**जालना :** कथित ऑडिओ क्लिप आणि राजकीय षड्यंत्राच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. 'आमच्याकडे आणखी पुरावे असून, आम्हाला पुढचे पाऊल उचलायला भाग पाडू नका,' असा सज्जड दम त्यांनी भरला आहे. तसेच, भाजपच्या पडद्यामागच्या राजकारणामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून, एका मोठ्या नेटवर्कमधील महिलेच्या दाव्यामुळे झालेले नुकसान ते खपवून घेणार नाहीत, असा मोठा दावा जरांगे यांनी केला आहे. मराठा समाजाने हे सत्य उघडकीस आणून शिंदेंची बदनामी टाळली असल्याने, त्यांनी समाजाचे आभार मानावेत, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले. मनोज जरांगे पाटील म्हणाले, मला खोटं म्हणणार? म्हणजे तुम्ही खरे आहात का? काय नीतिमत्ता कोणत्या स्टेपला आणून ठेवली तुम्ही राजकारणाची? तुम्ही तेच खरे, तुमची सत्ता तीच खरी आणि तुमचे मंत्री तेच खरं आणि जनता बोलतेय हे खोटं? किती नीच नीतिमत्तेवरती वागायला लागलात तुम्ही या मतदान करणाऱ्या लोकांशी. यांच्यावर अन्याय, मतदान करणाऱ्या लोकांवरतीच अन्याय करणार तुम्ही. हे नाही सहन होत आता. याचा आम्ही १०० टक्के फडशा पाडणार आहे. तुम्ही किती खोटं ठरवितात बघतो ना आमच्याजवळ आणखीन पण आहे. बघू तुम्ही काय काय खोटं खोटं म्हणताय ते. त्याच्यात नाही टिकत मग तुम्ही. हे पण पुढचं सांगतो. तुम्ही याचाच छडा लावा. आम्हाला पुढचं पाऊल उचलायला लावू नका, असा इशारा जरांगे यांनी सरकारला दिला आहे. पाटील तुम्ही पुढे वकिलांचा सल्ला घेताय म्हणजे उद्या जर सरकारचं असं तुम्हाला दडपशाही वृत्ती दिसायला लागली तर तुम्ही न्यायालयाचे दरवाजे ठोठावणार का? या प्रश्नाचे उत्तर देताना जरांगे म्हणाले की, हे बघा... हे देतीलच न्याय ही आम्हाला अपेक्षा आहे कारण कशावरनं सांगतो, हे पण सांगतो. शिंदे साहेब काय यांना सोडत नाहीत असं आम्हाला वाटतं. का? की राजकीय प्रतिष्ठेपेक्षा त्यांना वैयक्तिक स्टेटस टिकवणं गरजेचं आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६

## मुरूमचे सुपुत्र डॉ. गौरव मिनियार एम.एस. ऑर्थोपेडिक सर्जन; सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरुम येथील भाजपचे ज्येष्ठ नेते श्रीकांत (राजू) मिनियार यांचे सुपुत्र डॉ. गौरव अरुणा श्रीकांत मिनियार यांनी वैद्यकीय क्षेत्रातील एम.एस. ऑर्थोपेडिक्स (अस्थिरोग शल्यचिकित्सक) ही उच्च पदव्युत्तर पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल मुरूम शहरासह संपूर्ण पंचक्रोशीतून त्यांच्यावर अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.डॉ. गौरव यांनी शालेय जीवनापासूनच अभ्यासात आपली हुशारी व सातत्य टिकवून ठेवत यशाची परंपरा कायम राखली आहे. त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरूम येथून तर उच्च माध्यमिक (११ वी व १२ वी) शिक्षण लातूर येथील नामांकित राजर्षी शाहू महाविद्यालयातून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी पुणे येथील बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर नाशिक येथील डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमधून त्यांनी एम.एस. ऑर्थोपेडिक सर्जन ही पदव्युत्तर पदवी विशेष प्राविण्यासह संपादन केली.त्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार सुजितसिंह ठाकूर, संताजी चालुक्य, अभय चालुक्य यांच्यासह मुरूम शहरातील सर्व डॉक्टर, मान्यवर, मित्रपरिवार व नागरिकांनी डॉ. गौरव यांचे प्रत्यक्ष भेटून व दूरध्वनीवरून विशेष अभिनंदन केले. डॉ. गौरव यांच्या हातून भविष्यात अशीच उत्तम समाजसेवा घडो, अशा शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीस सर्व स्तरातून भरभरून उदंड शुभेच्छा देण्यात आल्या.

## राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबिरात राजीव गांधी महाविद्यालय करमाडच्या विद्यार्थिनीचा सहभाग



**छत्रपती संभाजीनगर** : राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथील विद्यार्थिनी अनमफातेमा झियाउल्लाख पटेल हिने राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनासाठी आयोजित राष्ट्रीय स्तरावरील पूर्व-प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबिरात (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत) सक्रिय सहभाग नोंदविला. या सहभागाबद्दल तिला अधिकृत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत १२ ते १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर येथे हे निवड शिबिर आयोजित करण्यात आले होते. भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय, पुणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचाही या आयोजनात सहभाग होता.या शिबिरात सहभाग नोंदवून विद्यार्थिनी अनामफातिमा पटेल हिने विद्यापीठाच्या शैक्षणिक व राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रातील उपक्रमांना गौरव प्राप्त करून दिला. राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनाच्या निवड प्रक्रियेत सहभागी होणे ही विद्यार्थ्यांसाठी शिस्त, नेतृत्व, देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याची महत्त्वपूर्ण संधी मानली जाते.या सहभागाबद्दल संबंधित विद्यार्थिनीचे शैक्षणिक व राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. तिचा हा सहभाग इतर विद्यार्थ्यांनाही राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.या बद्दल तिचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे, डॉ. किशोर काळे, एन एन एस विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. कालिदास फड एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. नितीन मुळे व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या

## बेळंब येथे पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : उमरगा तालुक्यातील बेळंब येथील तमाम नागरिकांनी दुष्काळी परिस्थितीचा सामना करत करत आता पिण्याच्या पाण्याचा ही मोठा संघर्ष करावा लागेल गावातील नागरिकांनी गावातीलपिण्याच्या पाण्याची समस्या दूर करावे म्हणून आज गावातील युवक तरुणांनी बेळंब येथील ग्रामविकास अधिकारी आर व्ही जाधव यांना निवेदन देण्यात आले या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहें कीं गावातील पाणी पुरवठा सुरळीत करावा व गावातील बोअर वेल वरील विद्युत मोटारी दुरुस्त करून लवकर पाण्याची समस्या दूर करून गावातील नागरिकांना पाण्या पासून भटकंती थांबवावी, जर पाणी पुरवठा सुरळीत झालं नाही तर दि 27 ऑक्टोबर रोजी ग्रामपंचात वर धडक मोर्चा घेऊन जायचा असे गावातील नागरिकांचा निवेदनात नमूद आहें तरी बेळंब येथील ग्रामविकास अधिकारी आर व्ही जाधव यांनी तात्काळ पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी जोर धरतं आहें

## अभाविपच्या पाठपुराव्याला यश; आयटीआय वसतिगृहातील वीज, पाणी व स्वच्छतेच्या समस्या सुटल्या



**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे)** : येथील अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), उमरगा शाखेच्या वतीने हुतात्मा वेद प्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरगा येथील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांबाबत संस्थेच्या प्राचार्यांना निवेदन देण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या समस्या आठ दिवसांत मार्गी न लावल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही अभाविप उमरगा शहर मंत्री समर्थ कुंभार यांनी दिला होता.वसतिगृहातील वीजव्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, परिसराची स्वच्छता, स्वच्छतागृहांची दुरवस्था तसेच विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या समस्यांकडे या निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते.कारण यामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्यच धोक्यात आले होते.विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी घरापासून दूर राहून वसतिगृहात वास्तव्य करावे लागते. अशा परिस्थितीत त्यांना आवश्यक मूलभूत सुविधा मिळणे गरजेचे आहे. याच उद्देशाने अभाविप उमरगा शाखेने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी पुढाकार घेत प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता.या दिलेल्या निवेदनाची दखल घेत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करत सकारात्मक पावले उचलली आहेत.त्यामुळे अभाविपने उपस्थित केलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्या आता मार्गी लागल्या असून, विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आणि त्यांच्या मूलभूत सुविधांसाठी अभाविपने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक कार्यवाही केल्याबद्दल संबंधित प्रशासनाचे अभाविप उमरगा शाखेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत असून केलेल्या कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविणे आणि त्यांच्या शैक्षणिक हिताचे रक्षण करणे हे अभाविपचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यापुढेही विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी अभाविप उमरगा शाखा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत राहील, अशी भूमिका अभाविप उमरगा शहर मंत्री समर्थ कुंभार यांनी व्यक्त केली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६


## मराठी विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शानदार उपक्रम



**पाटोदा (प्रतिनिधी) :** जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील मराठी विभागाच्या वतीने 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम व प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. शिवाजीराव काकडे होते, तर साधन व्यक्ती म्हणून मदत व पुनर्वसन विभाग शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रशिक्षक श्री. सिद्धेश्वर लटके हे उपस्थित होते. प्रमुख वक्ते श्री. सिद्धेश्वर लटके यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व विशद करताना नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचे स्वरूप, आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळात घ्यावयाची खबरदारी आणि आपत्तीनंतर करावयाच्या उपाययोजना यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. भूकंप, पूर, आग, वादळ यांसारख्या आपत्तींच्या वेळी घाबरून न जाता प्रसंगावधान राखणे, सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे आणि योग्य वेळी मदतकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.आपत्ती व्यवस्थापन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगून पुढे ते म्हणाले की, आपत्तीच्या प्रसंगी योग्य निर्णय घेणे, अफवांवर विश्वास न ठेवणे, बचावकार्य करणाऱ्या यंत्रणांना सहकार्य करणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळाल्यास संकटाच्या वेळी ते स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात, असे प्रतिपादनही त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. शिवाजीराव काकडे यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले. आपत्तीच्या काळात संयम, सजगता, तत्परता आणि सामूहिक सहकार्य या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले. या कार्यशाळेच्या प्रारंभी प्रा. बापू घोक्षे यांनी प्रास्ताविक करून कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.व्यासीठावर लोप्रशासन विभागाच्या प्रमुख तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट ) सदस्या प्रा.डॉ. कल्पना घारगे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगडे यांनी केले, तर प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी उपस्थित मान्यवर, प्रमुख वक्ते, अध्यक्ष आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. व मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम व प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेमुळे आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी ज्ञान देणारी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढवणारी ही कार्यशाळा उपयुक्त ठरली असल्याचे उद्गार उपस्थित मान्यवरांनी काढले.

## कन्नड शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शिस्तबद्ध पथसंचलन संपन्न



**कन्नड (अरुण थोरात):** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कन्नड तालुक्याच्या वतीने विजयादशमी उत्सवानिमित्त दि.25 ऑक्टोबर रोजी कन्नड शहरात शिस्तबद्ध पथसंचलन उत्साहात पार पडले. शहरातील माळीवाडा येथून पथसंचलनाला सुरुवात झाली. स्वयंसेवकांनी शिस्त, एकता आणि राष्ट्रभक्तीचे दर्शन घडवत शहरातून संचलन केले. पिशोर नाका, हिवरखेडा रोड मार्गे दत्त मंदिर येथे संचलनाची सांगता झाली.दत्त मंदिर येथे शस्त्रपूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून श्रीरंग गोसावी उपस्थित होते. त्यांनी आपल्या बौद्धिकातून संघकार्य, हिंदू समाजाचे संघटन, राष्ट्रभक्ती आणि शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. समाजात एकता निर्माण करून राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गजानन हेरिटेज अँड रिसॉर्टचे संस्थापक धीरज अग्रवाल उपस्थित होते. तसेच वक्ते म्हणून देवगिरी प्रांत कार्यकारिणी सदस्य श्रीरंग गोसावी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कन्नड तालुका कार्यवाह प्रमोद ढोले यांच्यासह विजय शिनकर, शशिन जाधव, मयूर राठोड, प्रवीण अहिरे, भूषण पोतदार, श्रीकांत जोशी, रेणुकादास कुलकर्णी, भूषण मोतीवाले, अभिषेक शेळके, आदित्य खैरनार, दक्ष टाक, शुभम वायडे, मकरंद जोशी, श्रीकांत जोशी, यांनी परिश्रम घेतले.स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध संचलनातून हिंदू समाजाचे संघटन, राष्ट्रभक्ती, सामाजिक एकात्मता आणि संघकार्याचा संदेश देण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात हा विजयादशमी उत्सव संपन्न झाला.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## आठवणींची कोजागिरी

मेत्ता ऐकतेस ना ...
कसलं करायचं सांगा
कोजागिरीचं कौतुक,
जेव्हा नशिबातच नाही,
माझ्या चंद्राचं सुख ...

साऱ्या जगाला लाभला
चांदण्यांचा सहवास,
माझ्या वाट्याला मात्र आला
आठवणींचाच त्रास ...

कोजागिरीचा चंद्रही
आज परका वाटतोय,
कारण माझा चंद्र दुसऱ्याच
आभाळात चमकतोय ...

**अमर हिवराळे**
**छत्रपती संभाजीनगर**


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६


## राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत किंजल सोनवणे हिला रौप्यपदक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** पाच सलग विजयांसह अंतिम फेरीत धडक; महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरामहाराष्ट्राची युवा तायक्वांदो खेळाडू कु. किंजल निलेश सोनवणे हिने ७० व्या शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत (SGFI) रौप्यपदक पटकावून राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे क्रीडा क्षेत्रातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.श्रीनगर येथे २१ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत किंजलने महाराष्ट्राच्या सीबीएसई संघाचे प्रतिनिधित्व केले. तिने उत्कृष्ट कौशल्य, आत्मविश्वास, जिद्द आणि लढाऊ वृत्तीच्या जोरावर अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.स्पर्धेच्या प्राथमिक फेऱ्यांमध्ये किंजलने दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले. तिने पहिल्या सामन्यात पश्चिम बंगाल, दुसऱ्या सामन्यात छत्तीसगड, तिसऱ्या सामन्यात गोवा, चौथ्या सामन्यात मिझोराम आणि पाचव्या सामन्यात लडाखच्या खेळाडूचा २-० असा पराभव केला. सलग पाच विजय मिळवत तिने अंतिम फेरीत प्रवेश केला.अंतिम सामन्यात आसामच्या खेळाडूविरुद्ध किंजलने चुरशीची लढत दिली. मात्र, या अटीतटीच्या सामन्यात तिला १-२ असा पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. पाच सलग विजय मिळवत अंतिम फेरीपर्यंत पोहोचण्याची तिची कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरली.किंजलचे हे यश तिच्या कठोर परिश्रमाचे, सातत्यपूर्ण सरावाचे आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणाचे फलित आहे. राष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## तालुक्यातील ५२ हजार नागरिकांची तहान टँकरवर; २१ टँकरच्या ३७ खेपा, दहा गावांना मंजुरीची प्रतीक्षा



**करमाड :** पावसाळ्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील ग्रामीण भागात हिवाळ्यातच पाणीटंचाईचे तीव्र चटके जाणवू लागले आहेत. सध्या तालुक्यातील १४ गावे आणि नऊ वाड्या-वस्त्यांमधील ५२ हजार ५३४ नागरिकांची तहान २१ टँकरच्या ३७ खेपांद्वारे भागवली जात आहे. उन्हाळ्यापूर्वीच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत असताना आता पशुधनाच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची चिन्हे आहेत. जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी होत असल्याने आगामी काळात नागरिकांसह जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहणार आहे. लाडसावंगी, कोनेवाडी, हिरापूर, गोलटगाव, वडाचीवाडी, एकोड, एकोड तांडा क्रमांक एक, दोन व तीन, फत्तेपूर, रामपूर, शेकटा, बाळापूर वसाहत, दरकवाडी, कौटगाव-अंबड, कौटगाव-जालना आणि सांजखेड या भागांत सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. विहिरी, तलाव आणि अन्य जलस्रोतांमध्ये पुरेसा पाणीसाठा नसल्याने नागरिकांना टँकरच्या खेपांची प्रतीक्षा करावी लागत आहे. पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी प्रशासनाला सातत्याने नियोजन करावे लागत आहे. भांबर्डा-बनगाव परिसरातील लाहुकी मध्यम प्रकल्पावर अवलंबून असलेल्या २२ गावांवरही पाणीटंचाईचे सावट आहे. सध्या या गावांना पिण्याच्या पाण्याबाबत तात्पुरता दिलासा मिळत असला, तरी धरणातील पाणीसाठा मर्यादित आहे. त्यातच अवैध पाणीउपसा सुरू राहिल्यास डिसेंबरमध्येच या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ येऊ शकते, पिण्याच्या पाण्याचा आवश्यकतेनुसार आढावा घेऊन नियोजन सुरू आहे Ãपाणीटंचाई असलेल्या गावांतील परिस्थिती आणि जलस्रोतांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. काही ठिकाणी तलावातील अनधिकृत विद्युतपंप संबंधित विभागाच्या सहकार्याने काढून पाणी नागरिकांसाठी सुरक्षित केले जात आहे. गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे. -शिवाजी साळुंके, गटविकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी राखून ठेवण्यासाठी अवैध पाणीउपशावर नियंत्रण आणण्याची मागणी होत आहे. पाणीटंचाईची तीव्रता वाढत असताना आणखी दहा गावांनी टँकर सुरू करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. कार्होळ, शेंद्राबन, शेंद्रा कमंगर, पिसादेवी, पाचोड, करंजगाव, चारठा, पिंपळगाव पांढरी, सहस्रमुळी आणि शिवाजीनगर-शेंद्रा कमंगर या गावांच्या प्रस्तावांवर निर्णय होणे बाकी आहे. या प्रस्तावांना मंजुरी मिळाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागणाऱ्या गावांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. प्रस्तावांची तपासणी करून पुढील कार्यवाही होईल Ãटँकरची मागणी करणाऱ्या गावांच्या प्रस्तावांची नियमानुसार तपासणी करून पुढील कार्यवाही केली जाते. पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यावर भर दिला जात आहे. -शिवानंद बिडवे, तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण

## अय्युब पठाण यांची बालसाहित्य पुरस्कारासाठी निवड



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** हिंगोली येथील समृध्दी प्रकाशन यांच्या वतीने दिला जाणारा यंदाचा संत नामदेव राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्कारासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक तथा बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील लेखक आणि कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या रंगीत चित्रासह बालकविता असलेल्या " अंगत पंगत " या बालकाव्यसंग्रहाची पुरस्कारासाठी निवड झालेली आहे.असे हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनाचे संयोजक प्रा.डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे यांनी नुकतेच पठाण यांना पत्राद्वारे कळविले आहे. बालकांच्या भावविश्वाला मनोरंजनातून तथा प्रबोधनातून आनंद देणारा अतिशय दर्जेदार व आशयघन बालकविता असलेल्या " अंगत पंगत " या संग्रहात असून आतापर्यंत या संग्रहाला संत नामदेव बाल साहित्य हा सातवा राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्कार आहे.अय्युब पठाण लोहगावकर यांचे बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाला " कौतुकाची थाप " हा पाठ संपूर्ण महाराष्ट्राच्या प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. तसेच डॉ.बा.आं.म.विद्यापीठामध्ये बी.ए. तृतीय वर्षाच्या सहाव्या सत्राला मराठवाडी कविता म्हणून " गंध फुलांचा " ही कविता मराठवाड्यातील सर्व महाविद्यालयातील मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट आहे. अय्युब पठाण यांचे आतापर्यंत 15 पुस्तके प्रकाशित आहे. श्री.पठाण यांची संत नामदेव राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्कारासाठी निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## संभाजीनगरात म्हाडाला घरे न देणाऱ्या २३ विकासकांवर गुन्हे दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत २० टक्के घरे आणि भूखंड म्हाडाला हस्तांतरित न करता नियमांचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्याप्रकरणी शहरातील ५ सदनिका प्रकल्प विकासक व १८ भूखंड प्रकल्प विकासकांवर क्रांती चौक पोलिस ठाण्यात शुक्रवारी (२३ ऑक्टोबर) रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. म्हाडाचे उपअभियंता ऋषिकेश रवींद्र व्यापारी यांच्या फिर्यादीवरून शासनातर्फे हा गुन्हा नोंदवला. 'दिव्य मराठी'ने ३० सप्टेंबर रोजी हे प्रकरण उजेडात आणले होते. त्यानंतर संभाजीनगर विभागीय म्हाडा कार्यालयाच्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल केला. शासन अधिसूचना व यूडीसीपीआर-२०२० च्या कलम ३.८.२ अन्वये ४००० चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्राचा विकास करताना २० टक्के क्षेत्र सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेसाठी राखीव ठेवून म्हाडाला हस्तांतरित करणे बंधनकारक आहे. मात्र, संबंधित २३ विकासकांनी स्वतःच्या हिश्श्यातील सदनिका व भूखंडांचे बांधकाम करून विक्री केली, परंतु म्हाडासाठी राखीव असलेले भूखंड व सदनिका हस्तांतरित केले नाहीत. म्हाडाच्या मुख्य दक्षता व सुरक्षा विभागाने (मुंबई) शासनाची फसवणूक केल्याची या विकसकावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. म्हाडाचे मुख्याधिकारी वैभव केदारे यांनी ९ ऑक्टोबरला पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांना पत्र देऊन फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यासंदर्भात कळवले होते. दरम्यान क्रांती चौक पोलिस ठाण्यात २४ विकासकांच्या विरोधात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ नुसार कलम ५२ (२ ) नुसार गुन्हा दाखल केला. आम्ही यासाठी सातत्याने 'म्हाडा'कडे पाठपुरावा करत आहोत. ७ ऑक्टोबरला म्हाडाच्या कार्यालयावर आंदोलनही केले. गरीबांना मिळणाऱ्या घरांचा आणि भूखंडांचा हा प्रश्न आहे. त्यामुळेच आम्ही सगळा खटाटोप करत आहोत. 'दिव्य मराठी'ने हे प्रकरण चव्हाट्यावर आणले. पण तरीही मोठ्यांना सोडले जात असेल तर नाईलाजाने आम्हाला कोर्टाचा दरवाजा ठोठावा लागेल. - पुष्पानंद नीतनवरे, सामाजिक कार्यकर्ते बसवंत बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे भीमराव पाटील, किशनचंद तनवाणी, तरविंदरसिंग महेंद्रसिंग थिल्लन, प्रेमचंद फकिरचंद मंत्री, निखिलेश प्रदीप जैस्वाल, ऋषिकेश प्रदीप जैस्वाल, दिलीप चव्हाण यांच्यासह १५ जणांवर क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केलेला नाही. म्हाडाच्या फिर्यादीत त्यांचे नाव घेतलेले नव्हते. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊ शकला नाही. म्हणजेच म्हाडाने त्यांना क्लीन चिट दिलेली आहे. यासंदर्भात 'दिव्य मराठी' प्रतिनिधीने म्हाडाचे मुख्याधिकारी वैभव केदारे यांना यासंदर्भात विचारण्याचा प्रयत्न केला. पण, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६

# अय्यनकाळी : अ दलित लीडर ऑफ ऑरगॅनिक प्रोटेस्ट

## जात, वर्ग आणि मानवी सन्मान यांच्या संघर्षाचे दस्तऐवजीकरण




आपल्या महाराष्ट्राला सामाजिक क्रांतीची एक जाज्वल्य परंपरा लाभली असून महात्मा जोतीराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारक विचारांनी विषमतेच्या भिंती कशा उद्ध्वस्त केल्या, हा इतिहास आपण अभिमानाने सांगतो. पण महाराष्ट्राबाहेर दक्षिणेकडे नजर टाकली, तर केरळच्या मातीतही असाच एक वादळी इतिहास घडला होता. तिथल्या शतकानुशतके चालत आलेल्या अमानुष जातव्यवस्थेला एका अशिक्षित पण कणखर माणसाने मुळापासून हलवून सोडले होते. त्या महामानवाचे नाव होते महात्मा अय्यनकाळी. एम. निसार आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या लेखिका मीना कंदासामी यांनी इंग्रजीत लिहिलेल्या **'अय्यनकाळी : अ दलित लीडर ऑफ ऑरगॅनिक प्रोटेस्ट' या** महत्त्वपूर्ण ग्रंथाचा अभ्यासक राहुल कोसम्बी यांनी मराठी अनुवाद केला आहे. हा ग्रंथ वाचताना इतिहासाचा केवळ ताळेबंद समोर येत नाही, तर उपेक्षितांच्या धगधगत्या लढ्याचा थरार अनुभवता येतो. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी केरळमधील त्रावणकोर संस्थानातील जातीय विषमता इतकी हिंस्र होती की, स्वतः स्वामी विवेकानंदांनी तिला 'वेड्यांचे रुग्णालय' म्हटले होते. अस्पृश्यतेपलीकडे जाऊन तिथे 'अस्पर्शता' आणि 'अदृश्यावस्था' होती; म्हणजे विशिष्ट जातींच्या माणसांनी सवर्णांच्या वाटेतही यायचे नाही, त्यांची सावलीही पडता कामा नये असा तो क्रूर व्यवहार होता. अय्यनकाळी यांचा जन्म 'पुलया' कुटुंबात २८ ऑगस्ट १८६३ रोजी वेंगणूर येथे अय्यन आणि माला या दांपत्याच्या पोटी झाला. तत्कालीन केरळमधील वर्णव्यवस्थेत या जातीला अत्यंत खालच्या दर्जाचे आणि 'अस्पृश्य' मानले जाई. लहानपणापासूनच त्यांना उच्चवर्णीयांकडून होणाऱ्या भेदभावाचा आणि अपमानाचा सामना करावा लागला. सवर्णांच्या मुलांसोबत खेळण्यावर, दिवसभर शेतात राबूनही मजुरी म्हणून सडलेला तांदूळ दिला जाई. दलितांना सार्वजनिक रस्त्यांवरून चालण्याची बंदी होती, अंगावर चांगले कपडे घालता येत नव्हते. दलित महिलांना शरीराच्या वरच्या भागात कपडे घालण्यास मज्जाव आणि वेठबिगारीचे जाचक नियम लादलेले होते आणि शिक्षणाचा तर विचारही करता येत नव्हता. अशा कमालीच्या कोंडमाऱ्यात अय्यनकाळी उभे राहिले. या सर्व शोषणातून त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध बंड करण्याची आणि आपल्या समाजाला आत्मसन्मान मिळवून देण्याची तीव्र भावना निर्माण झाली. त्यांनी शारीरिक सामर्थ्य व कुस्तीचे धडे घेतले, तसेच समवयस्क तरुणांचे संघटन उभारून शोषणाविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली. त्यांनी उभारलेले लढे हे पुस्तकाचे खरे बलस्थान आहेत. या पार्श्वभूमीवर **महात्मा अय्यनकाळी (१८६३–१९४१)** यांनी जमिनी पातळीवरून उभारलेला लढा केरळच्या आधुनिकतेचा पाया ठरला. एम.निसार आणि प्रसिद्ध कवयित्री-लेखिका मीना कंदासामी यांचे हे पुस्तक केवळ एका नेत्याचे चरित्र नसून, दलित चळवळीतील जैविक आंदोलन (Organic Protest) आणि सामाजिक पुनर्रचनेचा एक गंभीर अभ्यास आहे. प्रस्तुत ग्रंथात लेखकांनी अय्यनकाळी यांच्या ऐतिहासिक संघर्षांची नोंद प्रभावीपणे घेतली आहे. विल्लुवंडी समरम (बैलगाडी आंदोलन, १८९३) हे आंदोलन नोंद घेण्यासारखे आहे. तत्कालीन काळात सजवलेल्या देखण्या बैलगाडीतून प्रवास करणे हा केवळ सवर्णांचा विशेषाधिकार मानला जाई. अय्यनकाळी यांनी स्वतः दोन जातिवंत पांढरे बैल आणि एक सुंदर गाडी विकत घेतली. डोक्याला पांढरा फेटा, अंगात स्वच्छ वस्त्र परिधान केली आणि गळ्यात घुंगरू वाजणाऱ्या बैलांची गाडी हाकत ते थेट सार्वजनिक रस्त्यावरून निघाले. रस्त्यावर चालण्याचा हक्क मागण्यासाठी नाही, तर तो हक्काने बजावून घेण्यासाठी त्यांनी थेट मृत्यूच्या जबड्यात हात घातला होता म्हणजेच जातीवर्चस्वाला त्यांनी थेट आव्हान दिले. पुलाया समाजातील 'पंचमी' नावाच्या एका लहान मुलीला शाळेत बसवले, म्हणून सवर्ण जमीनदारांनी ती शाळाच जाळून टाकली. यावर अय्यनकाळी यांनी दिलेला लढा अंगावर काटा आणणारा आहे. अस्पृश्यतेमुळे स्वतः औपचारिक शिक्षण घेऊ न शकलेल्या अय्यनकाळी यांचा ठाम विश्वास होता की, **"दलितांवरील अन्यायाचा समूळ उच्चाटन करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण."** १९०४ मध्ये त्यांनी वेंगन्नूर येथे दलितांसाठी पहिली शाळा सुरू केली; मात्र सवर्णांनी ती जाळून टाकली. अय्यनकाळी यांनी पुन्हा ती शाळा उभी केली. सरकारने १९०७ मध्ये दलित मुलांना शाळांमध्ये प्रवेशाचा आदेश दिला, पण स्थानिक प्रशासनाने व सवर्णांनी तो लागू होऊ दिला नाही. या विरोधात अय्यनकाळी यांनी केरळच्या इतिहासातील **पहिला कृषी/शेतमजूर संप** पुकारला. त्यांनी सवर्ण जमीनदारांना सज्जड दम दिला, **"जर तुम्ही आमच्या मुलांना शिकू दिले नाही, तर तुमच्या शेतांमध्ये फक्त तणच उगवेल!"** दलितांनी शेतातील काम बंद केले. उपासमारीची वेळ आली तेव्हा अय्यनकाळी यांनी स्थानिक मच्छीमारांशी करार करून दलित तरुणांना मासेमारीच्या कामावर लावले. अखेर जमीनदार नमले आणि १९१० मध्ये दलित मुलांना सार्वजनिक शाळांमध्ये अनिवार्य प्रवेश मिळाला. १९०७ मध्ये त्यांनी स्थापन केलेल्या **'साधु जन परिपालन संघम'** या संघटनेने दलितांमध्ये शिक्षण, आत्मसन्मान, स्वच्छतेची जाणीव आणि कायदेशीर लढा निर्माण केला. नंतरच्या काळात ते 'श्री मूलम पॉप्युलर असेंब्ली' (प्रजासभा) मध्ये नामनिर्देशित सदस्य झाले, जिथे त्यांनी कायदेमंडळात दलित मजुरांच्या वेतनाचे, जमिनीचे आणि शिक्षणाचे प्रश्न ठामपणे मांडले. दलितांना स्वच्छ कपडे परिधान करणे, फेटा बांधणे, मिशी ठेवणे आणि अंगावर चांगले दागिने घालणे यावर बंदी होती. दलित महिलांना शरीराचा वरील भाग (वक्ष) झाकण्याचा अधिकार नव्हता; त्यांना गळ्यात दगड-धोंड्यांच्या माळा **(कल्लुमाला)** घालण्याची सक्ती होती. अय्यनकाळी यांनी स्वतः पांढरा लुंगी, पांढरा सदरा, खांद्यावर शाल, पांढरा फेटा आणि रुबाबदार मिशी ठेवून सवर्णांच्या वर्चस्ववादी नियमांना आव्हान दिले. १९१५ च्या 'पेरिनाड विद्रोह'नंतर त्यांनी 'कल्लुमाला आंदोलन' उभारले. सभेमध्ये त्यांनी महिलांना आवाहन केले: *"हे दगड-धोंडे दागिने नसून तुमच्या गुलामीची चिन्हे आहेत, ती फेकून द्या!"* नायर सुधारणावादी नेते परमेश्वरन पिल्लई यांच्या उपस्थितीत हजारो दलित महिलांनी गळ्यातील ती गुलामीची प्रतीके तोडून फेकून दिली आणि स्वतःचे शरीर झाकण्याचा अधिकार मिळवला. १८ जून १९४१ रोजी या महान क्रांतीसूर्याचे निधन झाले. केरळच्या सामाजिक पुनरुत्थानाचा इतिहास मांडताना मुख्य प्रवाहातील इतिहासकारांनी बहुतांश वेळा उच्चजातीय सुधारणा (उदा. नायर किंवा ईझवा चळवळी) यांना केंद्रस्थानी ठेवले. निसार आणि कंदासामी या पुस्तकात स्पष्ट प्रश्न उपस्थित करतात. दलित शोषितांचा लढा या 'प्रबोधन' इतिहासातून का डावलला गेला? मुख्य प्रवाहातील सुधारणावादी संघटना कशा प्रकारे जातींच्या अंतर्गत एकत्रीकरणाची साधने बनल्या? या चिकित्सेमुळे पुस्तकाला सबाल्टर्न इतिहासलेखनात एक वेगळे वजन प्राप्त होते. पुस्तकाच्या शीर्षकातील 'जैविक आंदोलन' (Organic Protest) हा शब्द ऐकायला जरी तात्त्विक वाटला, तरी प्रत्यक्षात तो मातीशी जोडलेला आहे. अय्यनकाळी यांनी कोणत्याही पाश्चात्त्य सिद्धांतातून किंवा पुस्तकी तत्त्वज्ञानातून हा लढा उभारला नव्हता. शेतात घाम गाळताना आणि रोजच्या जगण्याच्या संघर्षातून स्वाभाविकपणे उभा राहिला होता, हा मूळ लेखकांचा भाव अनुवादात अचूक उतरतो. स्व-बळावर मातीतून नैसर्गिकपणे उगवून येणाऱ्या रोपट्यासारखा हा उठाव होता; म्हणूनच लेखकांनी त्याला 'जैविक आंदोलन' म्हटले आहे. भाषेतील ओघ आणि ऐतिहासिक पुराव्यांचे संकलन यामुळे हे पुस्तक केवळ स्तुतीपर न राहता संशोधनात्मक बनते. निरक्षर असणाऱ्या एका नेत्याने आधुनिकतेची, मानवी हक्कांची आणि समतेची भाषा व्यवहारातून कशी मांडली, याचे सुंदर रेखाटन यात आहे. पानांच्या मर्यादित आवाक्यात लेखकांनी केरळच्या समाजव्यवस्थेचा आणि अय्यनकाळी यांच्या आंदोलनांचा पट उत्तम प्रकारे मांडला आहे. मूळ पुस्तकाचा आवाका संक्षिप्त असल्याने अनेक स्थानिक संघर्षांची आणि तत्कालीन राजकीय संदर्भांची अधिक तपशीलवार नोंद दिसून येत नाही. या संदर्भात पुस्तकाला लाभलेली ज्येष्ठ विचारवंत डॉ. आनंद तेलतुंबडे यांची विचारप्रवर्तक प्रस्तावना विशेष महत्त्वाची ठरते. सामाजिक विषमता, जातिव्यवस्था आणि वंचित समुदायांच्या संघर्षाचे चिकित्सक विश्लेषण करणाऱ्या तेलतुंबडे यांच्या प्रस्तावनेमुळे पुस्तकातील आशयाला व्यापक वैचारिक परिमाण प्राप्त होते. एखाद्या जननायकाच्या कार्याचे मूल्यमापन करताना केवळ त्याच्या शौर्याचा किंवा कर्तृत्वाचा गौरव करणे पुरेसे नसते; तर त्याच्या संघर्षामागील सामाजिक वास्तव, त्या संघर्षाने उपस्थित केलेले प्रश्न आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला मिळालेली दिशा यांचाही विचार करणे आवश्यक असते. तेलतुंबडे यांच्या प्रस्तावनेमुळे वाचकाला अय्यनकाळी यांच्या कार्याकडे अशा व्यापक सामाजिक संदर्भातून पाहण्याची दृष्टी मिळते. परिणामी, पुस्तकातील आशय एका व्यक्तीच्या जीवनचरित्रापुरता मर्यादित राहत नाही, तर जातिव्यवस्था, सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि वंचितांच्या मुक्तिसंघर्षाच्या व्यापक चर्चेशी जोडला जातो. या ग्रंथाचे आणखी एक महत्त्व अधोरेखित करणारी बाब म्हणजे ज्येष्ठ दलित विचारवंत कांचा इलाय्या यांनी केलेले कौतुक. त्यांच्या पाठराखणीमुळे अय्यनकाळी यांच्या कार्याची आणि या पुस्तकाच्या सामाजिक आशयाची व्यापक वाचकवर्गापर्यंत दखल पोहोचण्यास मदत होते. कांचा इलाय्या यांच्यासारख्या विचारवंताने या पुस्तकाचे कौतुक करणे ही त्याच्या वैचारिक महत्त्वाकडे लक्ष वेधणारी बाब आहे. अय्यनकाळी यांच्या कार्याचा विचार हा केवळ केरळच्या प्रादेशिक इतिहासाचा भाग नसून भारतीय समाजातील जातीय विषमता आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांशी संबंधित आहे. त्यामुळे त्यांच्या संघर्षाची ओळख करून देणारा हा ग्रंथ व्यापक भारतीय सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठीही उपयुक्त ठरतो. एखाद्या पुस्तकाचा अनुवाद करताना बऱ्याचदा भाषेचा गोडवा हरवतो आणि वाक्ये बोजड वाटतात. परंतु राहुल कोसम्बी यांच्या सिद्धहस्त लेखणीचे विशेष कौतुक यासाठी करावे लागेल की, हे पुस्तक वाचताना अनुवाद वाचत असल्याचा तिळमात्र भास होत नाही. त्यांनी क्लिष्ट भाषिक कसरती बाजूला ठेवून भाषा अतिशय साधी आणि वाचकाला खिळवून ठेवणारी ठेवली आहे. त्रावणकोरमधील स्थानिक चालीरीती, मल्याळी संदर्भ आणि तिथल्या जातीव्यवस्था मराठी वाचकाला सहज समजतील अशा रितीने त्यांनी मांडल्या आहेत. मूळ इंग्रजी पुस्तकातील भाषेची जी धार आणि शोषितांबद्दलचा जो संताप आहे, तो मराठी मांडणीतही तसाच धगधगता राहिला आहे. कुठेही आशयाशी तडजोड न करता त्यांनी या संघर्षाचे सौंदर्य जपले आहे. हे पुस्तक केरळच्या प्रबोधनाची एक नवी, खरी बाजू आपल्यासमोर उलगडते. केरळचा विकास किंवा तिथली साक्षरता ही केवळ उच्चवर्गीयांच्या सुधारणावादी संघटनांमुळे आलेली नसून, त्यात तळागाळातील दलितांच्या घामाचे आणि रक्ताचे शिंपण होते, हे या पानापानांतून सिद्ध होते. समाजातील विषमता, मानवी हक्क आणि उपेक्षितांचा स्वाभिमान समजून घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाने वाचावे असे हे पुस्तक आहे. एका महान जननायकाची शौर्यगाथा महाराष्ट्रातील वाचकांपर्यंत सहज आणि ओघवत्या रूपात पोहोचवणारा हा अनुवाद अत्यंत मोलाचा ठरतो.

**अय्यनकाळी । एम. निसार, मीना कंडासामी**
**भाषांतर : राहुल कोसम्बी**
**प्रकाशक : प्रॉमिथिअस बुक्स ।**
**किंमत : ₹ 225/- पाने : 108**
**पुस्तकासाठी संपर्क :**
7030232506

**प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना**